मूर्ख कोंबडा

इद्रिस

मराठी: अश्विनी बर्वे



'मूर्ख कोंबडा' ही इद्रिस शाह यांनी मुलांसाठी लिहिलेली एक सुंदर गोष्ट आहे. ही गोष्ट एका कोंबड्याची आहे, जो माणसासारखे बोलायला शिकतो. ही गोष्ट मुलांचे केवळ मनोरंजनच करणार नाही, तर त्यांना हेही शिकवेल की इतरांच्या बोलण्याने सहज प्रभावित होणे हानिकारक ठरू शकते आणि आपण नेहमी इतरांच्या बोलण्याचे मूल्यमापन करून स्वतःच्या विवेकबुद्धीचा वापर केला पाहिजे.

मूर्ख कोंबडा

ONCE UPON A TIME, in a country far away, there was a town, and in the town there was a chicken, and he was a very silly chicken indeed. He went about saying "Tuck-tuck-tuck, tuck-tuck-tuck, tuck-tuck-tuck." And nobody knew what he meant.

Of course, he didn't mean anything at all, but nobody knew that. They thought that "Tuck-tuck-tuck, tuck-tuck-tuck, tuck-tuck-tuck" must mean something.



फार पूर्वी, एका दूरच्या देशातील एका गावात, एक अतिशय मूर्ख कोंबडा राहत होता. तो सतत 'टुक-टुक-टुक, टुक-टुक-टुक, टुक-टुक-टुक' असे ओरडत असे. पण तो काय म्हणत होता हे कोणालाच कळत नव्हते.
अर्थात, त्याचा तसा काही अर्थ नव्हता, पण हे कोणालाच माहीत नव्हतं. त्यांना वाटायचं की 'टुक-टुक-टुक, टुक-टुक-टुक, टुक-टुक-टुक' या शब्दांना काहीतरी अर्थ असलाच पाहिजे.

Now, a very clever man came to the town, and he decided to see if he could find out what the chicken meant by "Tuck-tuck-tuck, tuck-tuck-tuck, tuck-tuck-tuck."

First he tried to learn the chicken's language. He tried, and he tried, and he tried. But all he learned to say was "Tuck-tuck-tuck, tuck-tuck-tuck, tuck-tuck-tuck." Unfortunately, although he sounded just like the chicken, he had no idea what he was saying.

Then he decided to teach the chicken to speak our kind of language. He tried, and he tried, and he tried.

It took him quite a long time, but in the end, the chicken could speak perfectly well, just like you and me.



एके दिवशी त्या गावात एक हुशार माणूस आला. त्याला आश्चर्य वाटले की, जेव्हा कोंबडा "टुक-टुक-टुक, टुक-टुक-टुक, टुक-टुक-टुक!" असा आवाज काढतो, तेव्हा त्याचा अर्थ काय असतो हे आपण शोधून काढू शकू.

सुरुवातीला, त्याने कोंबड्याची भाषा शिकण्याचा प्रयत्न केला. त्याने खूप प्रयत्न केले. पण एवढे प्रयत्न करूनही, तो माणूस फक्त 'टुक-टुक-टुक, टुक-टुक-टुक, टुक-टुक-टुक' एवढेच बोलू शकला. दुर्दैवाने, तो कोंबड्यासारखा बोलू शकत असला तरी, तो काय बोलत आहे हे त्याला कळत नव्हते.

मग त्याने त्या कोंबड्याला माणसांसारखं बोलायला शिकवायचं ठरवलं. त्याने वारंवार प्रयत्न केला.

त्याला कोंबड्याला शिकवायला बराच वेळ लागला, पण अखेरीस तो कोंबडा अगदी आपल्यासारखा चांगला बोलायला लागला.

After learning to speak as we do, the chicken went into the main street of the town and called out, "The earth is going to swallow us up!" At first the people didn't hear what he was saying because they didn't expect a chicken to be talking human language.

The chicken called out again, "The earth is going to swallow us up!" This time the people heard him, and they began to cry out,

"Good heavens!"

"Good gracious!"

"Dear me!"

"The earth is going to swallow us up!"

"Yes, indeed! The chicken says so!"

जेव्हा तो कोंबडा माणसांसारखं बोलायला शिकला, तेव्हा तो गावाच्या मुख्य बाजारात आला आणि ओरडला, "ही पृथ्वी आपल्या सर्वांना गिळून टाकणार आहे!" सुरुवातीला लोकांना तो काय म्हणत होता ते ऐकू आले नाही, कारण कोंबडा माणसांच्या भाषेत बोलू शकतो याची कोणी कल्पनाही केली नव्हती.

कोंबडा पुन्हा ओरडला, "पृथ्वी आपल्या सर्वांना गिळणार आहे!" ह्या वेळी लोकांनी त्याचे ऐकले आणि सर्वजण ओरडू लागले.

हे देवा !

प्रभूची कृपा!

आता काय होईल!

पृथ्वी आपल्याला गिळून टाकेल!

खरंच ! कोंबडा असंच म्हणाला!



लोक इतके घाबरले होते की त्यांनी आपल्या मौल्यवान वस्तू पिशव्यांमध्ये भरल्या आणि पृथ्वीपासून दूर पळून गेले.



They ran from one town to another.



ते एका शहरातून दुसऱ्या
शहरात पळत सुटले.

They ran through the fields and into
the woods and across the meadows.

ते शेतातून, जंगलातून आणि
नंतर कुरणांमधून धावत राहिले.







ते डोंगरांवर चढले
आणि मग डोंगरांवरून
खाली उतरले.



They ran down the world and up the world and around the world.

ते जगाच्या खालून धावले आणि जगाच्या वरून धावले आणि मग जगाभोवती फिरले.



They ran in every possible direction. But they still couldn't get away from the earth.

सर्व दिशांना धावले. पण एवढं धावल्यानंतरही ते पृथ्वीपासून दूर जाऊ शकले नाही.

Finally they came back to their town. And there was the chicken, just where they had left him before they started running.

"How do you know the earth is going to swallow us up?" they asked the chicken.

"I don't know," said the chicken.

At first the people were astonished, and they said again and again, "You don't know? You don't know? You don't know?"

And they became furious, and they glared sternly at the chicken and spoke in angry voices.

"How could you tell us such a thing?"

"How dare you!"

अखेरीस, ते आपल्या गावी परत आले आणि ज्या ठिकाणी त्यांनी कोंबड्याला सोडून पळ काढला होता, त्याच ठिकाणी त्यांना तो सापडला.
पृथ्वी आपल्याला गिळून टाकेल हे तुला कसे कळले? त्यांनी कोंबड्याला विचारले.
“मला माहीत नाही,” कोंबडा म्हणाला.
सुरुवातीला लोकांना आश्चर्य वाटले आणि ते म्हणत राहिले, "तुला माहीत नाही? तुला माहीत नाही? तुला माहीत नाही?"
मग त्यांना राग आला आणि ते कोंबड्याकडे एकटक पाहू लागले आणि नंतर रागाने बोलू लागले.
तू आम्हाला असं कसं सांगितलं ?
तुझी हिंमत कशी झाली?”



"You made us run from one town to another!"

"You made us run through the fields and into the woods and across the meadows!"

"You made us run up the mountains and down the mountains!"

तुझ्यामुळे आम्ही एका शहरातून दुसऱ्या शहरात पळत सुटलो! तुझ्यामुळेच आम्ही शेतातून जंगलात आणि मग कुरणांमधून पळत गेलो!



तुझ्यामुळे आम्ही डोंगरांवर चढलो आणि मग डोंगरांवरून खाली उतरलो.

"You made us run down the world and up the world and around the world!"

"You made us run in every possible direction!"

"And all the while we thought you knew the earth was going to swallow us up!"

तुझ्यामुळे आम्ही जगाच्या
खालून धावलो, जगाच्या वरून
धावलो आणि मग जगाला
वळसा घातला!
तुझ्यामुळे आम्ही
सर्व दिशांना धावत राहिलो!
आणि त्या संपूर्ण वेळी
आम्हाला वाटत होतं की,
ही पृथ्वीच आम्हाला गिळून
टाकेल !

The chicken smoothed his feathers and cackled and said, "Well, that just shows how silly you are! Only silly people would listen to a chicken in the first place. You think a chicken knows something just because he can talk?"

At first the people just stared at the chicken, and then they began to laugh. They laughed, and they laughed, and they laughed because they realized how silly they had been, and they found that very funny indeed.

तो कोंबडा आपले पंख फडफडवत हसला आणि म्हणाला, "अरे, यावरूनच कळतं की तुम्ही सगळे किती मूर्ख आहात! फक्त मूर्ख लोकच कोंबड्याच्या बोलण्याकडे लक्ष देतात. कोंबडा बोलू शकतो म्हणून त्याला काहीतरी कळतं असं तुम्हाला वाटलं कसं ?"

सुरुवातीला, लोक काही वेळ शांतपणे कोंबड्याकडे बघत राहिले आणि मग ते हसायला लागले. तो हसला, आणि तो आणखी हसला, आणि आपण किती मूर्ख आहोत व आपल्याला हे किती गमतीशीर वाटत आहे, असा विचार करत ते सर्वजण हसले.



After that, whenever they wanted to laugh they would go to the chicken and say, "Tell us something to make us laugh."

And the chicken would say, "Cups and saucers are made out of knives and forks!"

The people would laugh and say, "Who are you? Who are you?"

And the chicken would reply, "I am an egg."

The people would laugh at this, too, because they knew he wasn't an egg, and they would say, "If you're an egg, why aren't you yellow?"



त्या दिवसानंतर, जेव्हा जेव्हा त्याला हसावेसे वाटायचे
तर ते त्या कोंबड्याकडे येऊन म्हणायचे,
“आम्हाला हसवेल असे काहीतरी सांग”.
आणि मग कोंबडा म्हणे, “प्याले आणि वाट्या या वस्तू सुऱ्या व
काट्यांपासून बनवल्या जातात.”
मग लोक हसत आणि विचारत,
तू कोण आहेस? तू कोण आहेस?
आणि कोंबडा म्हणे,
“मी एक अंडे आहे.”
यावरही लोक खूप हसत.
कारण त्यांना माहीत होतं की ते अंडं नाही..
मग ते म्हणायचे, “जर तू अंडे असशील तर
मग तू पिवळा का नाहीस?

"I am not yellow," the chicken would reply, "because I painted myself blue."

The people would laugh at this, too, because they could see he was not blue at all, and they would say, "What did you paint yourself with?"

And the chicken would reply, "With red ink."

And at this they laughed the hardest of all.

"मी पिवळा नाही," कोंबडा म्हणाला.
कारण मी स्वतःला निळ्या रंगाने रंगवले आहे.
लोक यावरही हसत.
कारण त्यांना त्याचा रंग दिसत होता तिथे निळा रंग अजिबात नव्हता.
आणि ते विचारत,
तू स्वतःला कशाने रंगवले आहे?
आणि कोंबडा उत्तर द्यायचा, “लाल शाईने.”
आणि त्याचे उत्तर ऐकून ते खळखळून हसत.


And now people everywhere laugh at chickens and never take any notice of what they say — even if they can talk — because, of course, everybody knows that chickens are silly.

And that chicken still goes on and on in that town, in that far-away country, telling people things to make them laugh.

आणि आता सगळीकडे लोक कोंबड्यांला हसतात आणि ते बोलू शकत असूनही त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देत नाहीत—कारण आता अर्थातच सगळ्यांना माहीत आहे की कोंबडे मूर्ख असतात.

आणि तो कोंबडा आजही त्या शहरात, त्या दूरच्या देशात आपल्या शब्दांनी लोकांना हसवत राहतो.

समाप्त